# महिला सबलीकरणात बचत गटांची भूमिका एक विष्लेशनात्मक अध्ययन

1. प्रा. सौ. एस.एस. गावंडे 2. डॉ. बि.बि. तायवाडे

।इेजतंबजरू जगातल्या सर्व स्त्रियांचे प्रष्न आणि स्त्रियांचे दुय्यम स्थान हे जवळजवळ सारखेच आहे. या संदर्भातील जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे विचार विनिमय करुन त्यातून मार्ग काढण्यासाठी वैचारिक आणि कृतिषील आदानप्रदान करण्यासाठी

- जगातील महिलांची 1975 साली पहिली जागतिक महिला परिशद मेक्सिको येथे घेण्यात आली.
- 1980 साली दुसरी जागतिक महिला परिशद कोपनहेग येथे घेण्यात आली.
- 1985 साली तिसरी जागतिक महिला परिशद नैरोबी येथे घेण्यात आली.
- 1995 साली बीजिंग येथे चौथी जागतिक महिला परिशद घेण्यात आली.

भारतीय महिलांचा या परिशदेत सहभाग होता. या परिशदेत विकास, नियोजन आणि अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर लिंगभेदविरहित दृश्टिकोनाची गरज व्यक्त करण्यात आली. त्यानुसार जागतिक कृती धोरण आखण्यात आले. हे धोरण ‘बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्षन’ म्हणजेच (पी.एफ.ए) म्हणून ओळखल जातं. लिंगभेदविरहित समान न्याय आणि महिला सक्षमीकरणाच्या संदर्भातील पुनर्परीक्षण करताना बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्षन हा पाया मानला जातो.

भारतामध्ये 2001 पासून राश्ट्रीय स्तरावर महिला सक्षमीकरणासंबंषी निती–नियम तयार करुन 2001 हे महिला सषक्तिकरण वर्श घोशित केले गेले.

तेव्हापासून महिलांच्या विकासाच्या दृश्टिकोनातून वेगवेगळे विचार मांडण्यास सुरुवात झाली महिलांचा कुटूंबातील दर्जा, समाजातील स्थान व त्याच्या सर्व क्षेत्रातील भूमिका पार पाडत असताना त्यांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक याला विरोध करुन महिलांना कुटूंबात, समाजात व इतर सर्व क्षेत्रात पुरुशांच्या बरोबरीने समान स्थान मिळवण्यासाठी महिलांचे सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि षैक्षणिक सक्षमीकरण होणे आवष्यक आहे. असा विचार मांडला गेला. भारतामध्ये ग्रामीण भागात महिलांची सद्यस्थिती लक्षात घेता असे दिसून येते की, महिलांमध्ये षिक्षणाचे अत्यल्प प्रमाण, बेरोजगारी, दारिद्रय, कुपोशण, आजार, कौटूंबिक हिंसा, आत्महत्या इत्यादी समस्यांमुळे महिलांच्या विकासामध्ये अडथळे निर्माण होत आहेत. हे अडथळे दुर करण्यासाठी महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे आवष्यक आहे.

षहरातील स्त्रिया थोडया फार स्वतंत्र – आर्थिक, मानसिक, षारीरिक सक्षम असल्या तरी ग्रामीण भागातील महिलांची परिस्थिती खूपच वाईट आहे. ग्रामीण महिला, दारिद्रयरेशेखालील महिला ही सुध्दा अर्थार्जन करतेच की, पण तिच्या घरातील कामाचे, खळयातील कश्टाचे, षेतमजुरीचे, आर्थिक निकशांवर मोजमाप होत नाही. आपली कुटुंबे पुरुशप्रधान असली तरी मुलाबाळांना पालन–पोशणाचा विचार स्त्रीच अधिक करते आणि त्यासाठी पैसे लागतात. अषा कर्तृत्ववान, बुध्दिमान आणि सहनषील महिलांचा कुटुंबाच्या, गावाच्या, देषाच्या विकासासाठी उपयोग होत नव्हता. त्यामुळे महिला स्वयंसहाय्यता बचत गटांसारखी योजना अमलात आली.

महिलांचा आर्थिक विकास होणे म्हणजे महिलांचे आर्थिक सबलीकरण होय. महिलांच्या सबलीकरणात आर्थिक प्रगती बरोबर सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक विकास होणेही अभिप्रेत आहे.

आज जागतिकीकरणाच्या काळात सबलीकरण म्हणजे वंचित घटकांची दडपणूक व षोशण थांबविण्याची क्रिया होय. व्यवस्था निट चालविण्यासाठी काही नियम संरचना बनवून वंचित घटकांना निर्णय प्रक्रियेत सहभागीत्व देणे व त्यांचे षोशण किंवा दुर्बलता संपविण्याची प्रक्रिया होय.

झमलूवतकेरू महिला सबलीकरण, बचतगट, सामाजिक–आर्थिक पत

## महिला सबलीकरणाची संकल्पनाः–

**ॲडम्स (1996) यांच्या मते**, "सबलीकरण म्हणजे असे साधन की ज्यामुळे व्यक्ती, गट आणि समाज परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आपले ध्येय साध्य करतात, ज्याद्वारे ते स्वतःची मदत स्वतःच करतात आणि दुसऱ्यांच्या जीवनाचा स्तर महत्तम करण्याचे काम करतात."

**दुभाशीच्या मते,** "सबलीकरण म्हणजे स्वतःच्या जीवनावर नियंत्रण, प्रथम वित्तीय, भौतिक आणि मानवी संसाधनावर व दुसरे म्हणजे श्रध्दा, मुल्य आणि दृश्टीकोन यांच्यावर नियंत्रण होय."

महिला सक्षमीकरणाच्या वरील विचारातुन आत्मविष्वासामध्ये, कुटूंब व समाजात निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये त्या सक्षम झाल्या त्यांना अर्थकारणात व समाजकारणात पुरुशांच्या बरोबरीने आणने आणि मानसिक, आर्थिक दृश्टया सुदृढ करणे असा अर्थ स्पश्ट होतो.

## बचतगट संकल्पना :–

'महिलांनी, महिलांच्या विकासासाठी, महिलांमार्फत चालविली जाणारी प्रभावी व सुनियोजित आर्थिक संरचना म्हणजे बचत गट'

समान गरजा असलेल्या व्यक्तिंनी एकत्र येऊन समान आर्थिक उद्विश्टये व सामाजिक उद्विश्टये साध्य करण्यासाठी एकाच प्रदेषात व भागातील व्यक्तिंनी एकत्र येऊन समुह स्थापना व वृध्दींगत करुन स्वेच्छेने सहभागी होणे याला स्वयंसहाय्यता बचतगट म्हणतात.

बचतगट ही बचतीच्या माध्यमातून समान सामाजिक व आर्थिक पार्ष्वभूमी असलेल्या व्यक्ती स्वतरुच्या इच्छेने आपली गरज ओळखून गटाची स्थापना करतात. गटाच्या बचतीच्या माध्यमातून कौटुंबिक, आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केला जातो. महिलांना एकत्र येण्याची संधी, विचार प्रकट करण्याचे मनोधैर्य, निर्णयाची क्षमता, आर्थिकतेचे नियोजन, एकमेंकींवरील विध्वास, बचत, बचतीतून कर्ज, कर्जाची योग्यवेळी परतफेड, उद्योगषीलतेचे ज्ञान इ. सर्व बाबी बचतगटामुळे ज्ञात होतात.

## स्वयंसहाय्यता गटाद्वारे महिलांचे सबलीकरण :–

समाजातील विशमता कमी करण्यासाठी विविध विकास योजना, चळवळी फोफावत आहेत. त्यातून सबला या दृश्टिकोनातून परिवर्तन होत आहे. सबला व्यक्ती सभोवतालचे वातावरण बदलून षाध्वत विकास करतात, म्हणून कमकुवत महिला घटकांना स्थायी स्वरुपात षाध्वत आर्थिक स्त्रोत निर्माण केल्यास सबलीकरण होऊ षकते. स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे महिलांचे विविध स्तरावर सबलीकरण होत आहे.

- **आर्थिक सबलीकरण**
- **सामाजिक सबलीकरण**
- **राजकीय सबलीकरण**

महिला सबलीकरणाचे एक प्रभावी माध्यम म्हणुन बचत गटांना मान्यता मिळाली आहे. दारिद्रय निर्मूलनाचे साधन, परिवर्तनाचे माध्यम, स्त्री संवादाचे व्यासपीठ, महिलांच्या आत्मसन्मानाची पाऊलवाट, ग्रामीण विकासाचा मार्ग, गरिबांच्या आषेचा किरण, स्वयंरोजगाराचा मार्ग अषा विविध महत्त्वपूर्ण भूमिका बचत गट पार पाडीत आहेत. बचत गटांमुळे महिलांमधील आत्मविध्वास वाढत आहे.

यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण महिलांचा विकास होण्याच्या दृश्टीने बचतगट हे प्रभावी माध्यम ठरु लागले आहे. ग्रामीण महिलांच्या जीवनात मागासलेपणा, उदासीन दृश्टीकोन, दूरदृश्टीचा अभाव होता. परंतु बचतगटाच्या चळवळीने महिलांच्या जीवनात चैतन्य निर्माण केले. ग्रामीण महिला साामाजिक व आर्थिक दृश्टीने चांगल्या प्रकारचे जीवन जगत आहेत म्हणून ग्रामीण महिलांच्या सक्षमतेसाठी बचतगटाचे कार्य कषा प्रकारचे आहे याचा अभ्यास प्रस्तुत संषोधनामध्ये केलेला आहे.

महिलांच्या कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासात बचतगटाची भूमिका प्रभावी ठरत आहे. महिलांच्या बचतीच्या सवयीचा महिलांना लाभ होत आहे. बचतगटाबाबत षासकीय योजनेमुळे महिलांना आर्थिकतेच्या संधी उपलब्ध्द झालेल्या आहेत. गटातील महिलांनी कर्जाची योग्य वेळी परतफेड केल्याने व कर्जातून अनेक छोटे–छोटे व्यवसाय उभारल्याने बॅकेचा विद्वास संपादन केला आहे. ग्रामीण महिलांच्या व्यक्तीमत्वातील अनेक गुणवैषिश्टयांचा विकास झालेला आहे. कौषल्य, क्षमता, आत्मविद्वास, आर्थिक व्यवहार, बॅकेचे व्यवहार, सामाजिक वागणूक, नियोजन, व्यवसायाचे कसब इ. गुणांचा विकास झाल्याने त्याचा समाजातील सामाजिक दर्जा उंचावत आहे.

बचतगट हा दारिद्रय निर्मूलनाचा प्रभावी मार्ग आहे. ग्रामीण भागातील कुटूंबाला दारिद्रयातून मुक्त होण्यासाठी महिलांच्या सामाजिक जीवनात परिवर्तन करण्यासाठी बचतगटाची चळवळ गतिमानतेकडे वाटचाल करत आहे. बचतीच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, व्यवसायातून आर्थिकता मिळवण्यासाठी प्रेरणा देणारा बचतगट हा आज प्रेरक ठरत आहे. सामाजिक उपक्रम गटाच्या माध्यमातून राबवून सामाजिक विकासाला चालना देण्याचे कार्य करत आहे. बचतगटातील महिलांनी वेगवेगळे पदार्थ, वस्तू बनवून प्रदर्षनात नावलौकिक मिळवला आहे. बाजारपेठेची मागणी व पुरवठा हा नियम माहित झाल्याने अर्थषास्त्रीय सिध्दांतातून व्यवसायात मार्गक्रमण करत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेतील 50 टक्के आरक्षणाचा फायदा घेवून राजकीय पदावर मिळालेल्या संधीलाच घेवून सक्षमतेने राजकीय पद सांभाळताना यांना गटातील बैठकीमध्ये मत व्यक्त करणे, महिला मेळावे, षिबीरे, व्यावसायिक प्रषिक्षणात मत मांडणे इ. चा फायदा झालेला आहे. महिला सक्षमीकरणात बचतगटाचे योगदान महत्त्वपूर्ण असलेले दिसते.

बचत गटाची चळवळ ही महिलांनाच सक्षम करणारी आणि खरोखर अत्यंत यषस्वी ठरलेली अषी मोठी व्यापक चळवळ आहे. आर्थिक दृश्टया कमकुवत गटातील लघुव्यवसायिकांसाठी कर्ज पुरवठा होण्याचे बचत गट हे एक साधन आहे. एकत्रितरित्या तयार झालेला गट, त्या गटांनी केलेली बचत, गटाअंतर्गत तारणासहित कर्जपुरवठा, वस्तुरुप तारणऐवजी, सामाजिक आणि समुहाचे तारण, लोकषाही कार्यपध्दतीने तयार झालेले महिलांचे असंख्य बचत गट, हे महिलांच्या सक्षमीकरणाचे गरीबीविरुध्द लढयाचे आणि सावकारी पाषातून मुक्ततेचे एक प्रभावी हत्यार आहे. या चळवळीमुळे स्त्रियांमध्ये जागृती निर्माण होऊ लागली, स्त्रिया निरनिराळया क्षेत्रात चमकू लागल्या, पुढे येऊ लागल्या, 'स्त्रि चळवळीनेही जोर धरला आणि स्त्रिया सक्षम होण्यास सुरुवात झाली.

**अध्यनाचा उद्देष :–**

1. महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेत स्वयंसहाय्यता बचत गटांच्या कार्याचा अभ्यास करणे.

2. यवतमाळ जिल्हयातील महीला बचत गटाच्या लाभार्थींच्या वैयक्तीक, कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक बाबींवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे.
3. स्वयंसहायता बचत गटाच्या कार्यातील उणीवांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविणे व महिला सबलीकरण प्रतिमानाचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलन** : कंजं बवससमबजपवद

**“महिलांच्या आर्थिक, सामाजिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान विशेष अभ्यास – यवतमाळ जिल्हा.”** हा संषोधनाचा विशय असून तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्य स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. स्वयंसहाय्यता गटावर तसेच महिला सक्षमीकरण या विशयावर आधारित प्रकाषित झालेल्या विविध पुस्तकांमधून माहिती मिळविलेली आहे.

**षोध :–**

सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी केवळ 1टक्के असहमत आहेत आणि 6टक्के असमाधानी आहेत की त्यांचे उत्पन्न एसएचजीमध्ये सामील झाल्यानंतर समाधानकारक होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे 28टक्के सहमत आणि असहमत नाहीत आणि बहुसंख्य म्हणजेच 56टक्के सहमत आणि 9टक्के अत्यंत सहमत आहेत.

बहुतेक सर्वेक्षणात 40 टक्के प्रत्येक उत्तरप्रतिबंधक समाधानी आहेत आणि असमाधानी आहेत की बचत गटात सहभाग घेण्यापूर्वी त्यांची बचत समाधानकारक आहे, 4टक्के, 4टक्के आणि 12टक्के, अनुक्रमे अत्यंत सहमत आणि सहमत नाहीत किंवा असहमत नाहीत.

केवळ 4टक्के उत्तरदायी असहमत आणि अत्यंत असहमत आहेत की बचत गटामध्ये सामील झाल्यानंतर त्यांची बचत समाधानकारक आहे. आश्चर्याची बाब म्हणजे 12टक्के सहमत आणि असहमत आहे बहुतेक जणांची बचत परिणामांमधील चांगले सुधारणा मध्ये 68टक्के सहमत आहे आणि 9टक्के अत्यंत सहमत आहे.

या अभ्यासातून हे निष्कर्ष निघाले की सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी 52टक्के उत्तरदायी असहमत आहेत कारण त्यांच्याकडे अजूनही बचत गटामध्ये सामील होण्याआधी व्यवसाय चालविण्यासाठी उपयुक्त कार्यान्वयन मदत नाही आणि 12टक्के त्यापेक्षा जास्त असहमत होते. केवळ प्रत्येकी 8टक्के सहमत आहे आणि अत्यंत सहमत आहे. तर 20टक्के उत्तरदारही सहमत व असहमत नाहीत.

सर्वेक्षणातून असे निष्कर्ष काढला जातो की सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी 52टक्के प्रतिसाधी सहमत आहे आणि 12टक्के जास्त सहमत आहेत कारण त्यांना असे वाटते की एमएफआय कडून प्राप्त झालेल्या ऑपरेशनल

सहाय्यमध्ये सुधारणा झाली आहे आणि एसएचजीमध्ये सामील झाल्यानंतर व्यवसाय चालवणे उपयुक्त होते आणि 8टक्के प्रत्येक असहमत आणि अत्यंत असहमत आहे. तर 20टक्के उत्तरदारही सहमत नाहीत व असहमत नाहीत.

**निश्कर्श :–** नमुना सर्वेक्षणांद्वारे त्यांच्या प्राथमिक विषयावरील विश्लेषणातून शोधण्यात आलेल्या संशोधनातून असे आढळून आले आहे की सेल्फ हेल्प ग्रुप बँक लिंकेज– एसएचजीबीएलपी मायक्रो फायनान्स बँक लिंकेज कार्यक्रमाद्वारे महिला सशक्तीकरण करण्यामध्ये एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारत सरकारच्या 2015 च्या अहवालानुसार, भारतातील गरीबी 2004–05 मध्ये 37.2टक्के वरून 2011–12 मध्ये 21.9टक्के वर आली आहे. 31 मार्च 2015 पर्यंत एमएफआयने पूर्ण केलेल्या ग्राहकांची एकूण संख्या 371 लाखांवर होती. एमएफआयचे ग्राहकांचे आवाहन 2005 ते 2011 पर्यंत 317 दशलक्षांपर्यंत पोहोचले होते. 2014–15 दरम्यान, बचत गटाच्या क्षेत्रातील सुमारे 2.68 लाख नवीन बचत गटांना 31.3.2015 रोजी औपचारिक आर्थिक संस्थांशी जोडलेल्या बचत गटांची संख्या 76.9 7 लाखांवर आहे. मागील वर्षाच्या तुलनेत बचत गटाची संख्या 3.5 9 टक्क्यांनी वाढली आहे. यवतमाळ जिल्ह्यात ठव्ए ैठए ठब्डए न्ब्ए च्छठए ल्क्ब्ए ठव्ठ लवकरच सकारात्मक वृद्धीमुळे वर्ष 2015 साठी खाती उघडणे आणि कर्ज वितरणात मोठ्या प्रमाणावर योगदान आहे.

मायक्रो फायनान्सिगमुळे बचत गटाच्या महिला सदस्यांना वॉशिंग पावडर, शेळीची पाळणं, शेती, मेणबत्तीची निर्मिती, सहयोगी उद्योग, चकी व गृहउद्योग पापड, लोणचे इत्यादी. यासारख्या विद्यमान आणि नवीन व्यवसायांच्या विस्तारासाठी चालण्यास मदत होते. असे दिसून येते की लोकशाही संस्कृतीमध्ये सहभाग वाढला आहे ज्यात सर्व सदस्यांना सक्रियपणे आणि बचत गटाच्या बैठकीदरम्यान सहभागी होणे आवश्यक आहे. अनौपचारिक चर्चा चालू घडामोडींशी संबंधित, चर्चासत्रे, बँकेच्या अधिकार्यांशी संवाद आणि एनजीओद्वारे देण्यात येणारी विविध माहिती, स्पर्धा सुधारण्यास मदत होते. स्पर्धा निर्णय प्रक्रियेत भाग घेऊन महिला सदस्यांमध्ये जागरुकता आणते, याला वादविवाद न म्हणता चर्चा म्हणायला हवे.

अशाप्रकारे असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की लघु उद्योग (एसएचजी–बँक लिंकेज प्रोग्राम) योजनांमध्ये समाधानकारक परिस्थिती आहे आणि अनेक प्रतिसादकांनी या योजनांविषयी सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे. बचत गटा अंतर्गत महिला सहभागातून स्पष्टपणे गरीब महिलांचे राहणीमानावर फार चांगला परिणाम होऊ लागले आहे आणि त्यांना फक्त वैयक्तिक म्हणूनच नव्हे तर संपूर्ण समाजातील विविध स्तरांवर आणि समाजातील कुटुंबातील सदस्य म्हणूनही सशक्त करण्यात आले आहे. बचत गट हे समुदाय संस्था म्हणून उदयास आले आहेत ज्याद्वारे औपचारिक क्षेत्रातील व्यवस्था ग्रामीण भागात पोहचते जी पूर्वी बँक कर्ज देण्यास पात्र नव्हती. एसएचजी–बँक लिंकेज बँकांना तीन फायदे प्रदान करते. विशेषतटक्के बचत आणि उत्पन्नात वाढ, राजकीय कामकाजात सहभाग, योग्य निर्णय घेणे, पैशाचे वापर करताना सावधगिरी बाळगा, दारिद्र्य निर्मूलन, आत्मविश्वास, राजकीय जागरूकता, निवडणूक लढविणे, नेतृत्व गुण, सामाजिक स्थिती आणि सहभागिता, आपले

मत मांडणे, म्युच्युअल मदत आणि समर्थन मिळते. नाबार्ड ने विकसित केलेल्या अंतिम बचत गट आणि बँक लिंकेज कार्यक्रमात फक्त बचत आणि कर्ज सेवाच उपलब्ध आहेत परंतु हे बचत गट बँक लिंकेज कार्यक्रमात तांत्रिक सहाय्य, भांडवली निधी आणि विपणन समर्थन प्रदान करून महिलांच्या चांगल्या सक्षमीकरणास मदत करेल.

**संदर्भ :–**


1. प्रा. एम.यु.मुलानी – महिला स्वयंसहायता बचतगट
2. ज.षं. आपटे, पुश्पा रोडे –भारतातील महिला विकासाची वाटचाल
3. डॉ. षुभांगी गोटे, महिला सबलीकरण स्वरुप व समस्या
4. रमेष बालवाड –बचत गट –रचना व कार्यपध्दती (मार्गदर्षक)
5. डॉ. प्रमोद जोगदेव– बचत गट – संधी आणि समृध्दी
6. प्राचार्य डॉ. संभाजी देसाई – महिला सबलीकरण
7. डॉ. संतोश कुमार सिंह कुरुक्षेत्र मार्च 2015 – महिला सषक्तीकरण एवं सरकारी प्रयास
8. प्रा. डॉ वर्शा गंगणे – स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव
9. डॉ. बी. एम. कऱ्हाडे षास्त्रीय संषोधन पध्दती